| CNR No : MHAH-1900-1132-2022 | **म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ५२/२०२२**<br>**सारीका पाचरणे वि. पांडुरंग गुजर** |
|---|---|

## नि.क्र.३२ वर आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जामध्ये दुरुस्ती होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराने प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाले याच्या बांधकाम ठेकेदारी व्यवसायाबाबत, त्यातुन मिळणा–या उत्पान्नाबाबत तसेच शेतीतुन मिळणा–या उत्पन्नाबाबत, स्त्रीधन परत मिळण्याबाबत आणि मुळ अर्जात अन्नवस्त्र म्हणुन मागणी केलेल्या रकमेबाबत दुरुस्ती होवून मिळण्याची मागणी केलेली आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे सदरचा अर्ज घाई गडबडीत दाखल केल्यामुळे सामनेवाल्या संबंधी प्रस्तुत अर्जात नमुद केलेली माहिती अर्जदाराकडुन मुळ अर्ज दाखल करतेवेळी प्राप्त झाली नाही. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. सामनेवाले यांनी प्रस्तुत अर्जास नि.क्र.३४ वर म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शवुन अर्ज ना मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुतचा अर्ज, दोन्ही बाजुंचे म्हणणे आणि प्रकरणातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवाले तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षणाचा कायद्या अंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जदारांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत अर्जाद्वारे मागितलेली दुरुस्तीमुळे अर्जाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही, सामनेवाले यास सदर दुरुस्ती प्रमाणे म्हणणे दाखल करण्याची व पुरावा देण्याची संधी मिळणार आहे. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे सामनवालेचे कोणतेही नुकसान होत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर निकाली होण्याकरीता व नैसर्गीक न्यायतत्वाचा विचार करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची शेवटी त्यांनी विनंती केली. याउलट

सामनेवालेतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अर्जदाराने पुरावा दाखल केला असुन सामनवालेतर्फे अर्जदाराचा उलटतपास देखील पुर्ण झालेला आहे. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेकामी झालेला उशिराबाबत अर्जदाराने कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे अर्जाच्या मुळ स्वरुपात बदल होणार असुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास सामनेवालेचे नुकसान होणार आहे. सदरची दुरुस्तीची आवश्यकता नाही. शेवटी त्यांनी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली.

०६. प्रस्तुतचे प्रकरण महिलांचे कौटुंबिक अत्याचारापासुन संरक्षण कायद्यातील कलम १२ अंतर्गत दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अर्जदाराने पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असुन सामनेवाले यांनी अर्जदाराचा उलटतपास देखील पुर्ण केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार यांच्या पुढील पुराव्याकरीता प्रलबींत असतांना प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास येते. अर्जदाराने प्रस्तुत अर्जाद्वारे सामनवाले यांचा व्यवसाय, उत्पन्न, स्त्रीधन परत मिळणेबाबत आणि सामनेवालेकडुन मागणी केलेल्या पोटगीच्या रकमेत वाढ होवून मिळण्याकरीता दुरुस्ती होवून मिळण्याची मागणी केलेली आहे. प्रस्तुतचे प्रकरण अर्जदाराच्या पुरव्याकरीता प्रलबींत असल्याचे जरी निदर्शनास येत असले तरी केवळ त्या कारणावरुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचीत होणार नाही. अर्जदाराच्या कथनांप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल करतेवेळी घाई गडबड झाल्यामुळे अर्जदाराकडुन सामनेवाले बाबत प्रस्तुत अर्जात नमुद केलेली माहिती प्राप्त करता आली नाही. याठिकणी ही बाब नमुद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराने सामनवाले यांच्या व्यवसायाबाबत, उत्पन्नाबाबत आणि स्त्रीधन परत मिळण्याबाबत दुरुस्तीची मागणी केलेली आहे. सदर मागणीचा विचार केला असता प्रस्तुतचा अर्ज

मंजूर केल्यास मुळ अर्जाच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही, अथवा सामनेवाले यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास अर्जदारास सामनेवाले याच्या व्यवसायाबाबत व उत्पन्नाबाबताचा पुरावा प्रस्तुत प्रकरणात दाखल करता येणार नाही. त्यामुळे अर्जदाराचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येवू शकत नाही. तसेच प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास सामनवाले यास त्याबाबत म्हणणे दाखल करण्याची व त्या अनुषंगानेपुरावा देण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली मागणी, अर्जाचे स्वरुप, अर्ज दाखल करण्यास झालेला उशिर आणि नैसर्गीक न्यायतत्वाचा विचार करता अर्जदाराचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. नि. क्र.३२ वरील अर्ज रक्कम रु. ५००/– च्या दंडासह मंजूर करण्यात येत आहे. अर्जदाराने दंडाची रक्कम सामनेवाला यांना पुढील तारखेपर्यंत द्यावी.

०२. अर्जदाराने दंडाची रक्कम सामनेवाला यांना दिल्यानंतर अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त अर्जाची प्रत त्वरीत दाखल करावी.

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2025.12.31 11:12:37 +0530

ठिकाणः शेवगांव (डी.आर. कुलकर्णी)
दिनांकः–३०.१२.२०२५. २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शेवगांव.